आर.सी.सी क्र. १५२६/२०१८

सरकार विरुध्द दिलीप हाके

**निशाणी क्र. १७ / क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी–**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. तुषार काशिनाथ शिसोदे,**

वय – ५० वर्षे, व्यवसाय – कोषाध्यक्ष–

निवासस्थान– तारक हाउसिंग सोसायटी, बीड बायपासरोड, औरंगाबाद.

---

**<u>सरतपासणी अभियोग पक्षा करीता</u>**

**<u>श्री. द. रा. काठुळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे –</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. आरोपी न्यायालयात हजर आहे. आरोपी हे विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून कार्यरत होते. मी सदर संस्थेचा कोषाध्यक्ष म्हणून कार्यरत आहे. आमच्या संस्थेने प्रयोगशाळा सहाय्यक या पदाकरीता जाहीरात प्रसिध्द केलेली होती. आरोपीने सदर पदाकरीता अर्ज केलेला होता. संस्थेने त्यांना मुलाखतीकरीता बोलाविलेले होते. सदर मुलाखत झाल्यानंतर त्यांना नियुक्ती आदेश आरोपीचे अनुसूचित जमातीचे आरक्षनास अनुसरून देण्यात आलेला होता. आरोपीची जात धनवर अशी आहे. सदर आरोपीचा नियुक्ती आदेशाची सत्यप्रत मी दाखल केलेली आहे. सदर सत्यप्रतिस निशाणी देण्यास आरोपीतर्फे हरकत नाही. सदर आदेश प्रतिवर सचिव श्री. सुदामराव पंढरीनाथ शिसोदे यांची सही आहे. सदर नियुक्त आदेश **<u>निशाणी क्रमांक १८</u>** वर आहे. त्यानंतर संस्थेने आरोपीचे जातप्रमाणपत्र जात पडताळणी समिती औरंगाबाद यांचेकडे पडताळणीकरीता पाठविले. सदर समितीने दिनांक १०.०२.२०१७ रोजी आदेश दिला व सदर आरोपीने दाखल केलेले जातप्रमाणपत्र हे अवैध आहे व त्याचे विरुध्द गुन्हा दाखल करावा असे त्यामध्ये नमुद करण्यात आलेले होते. सदर आदेशाची सत्यप्रत मी या कामात दाखल करीत आहे. सदर सत्यप्रत **<u>निशाणी क्रमांक २१</u>** वर आहे. मला संस्थेने आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्याकरीता अधिकार पत्र दिलेले होते. सदर अधिकार पत्रावर माझी व संस्थेचे सचिवांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर अधिकार पत्र **<u>निशाणी</u>**

**निशाणी क्र. १७ / क**

**<u>क्रमांक २२</u>** वर आहे. त्यानंतर मी क्रांतीचौक पोलीस स्टेशनमध्ये जाऊन गुन्हा दाखल केला. मला दाखविण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर फिर्याद **<u>निशाणी क्रमांक २३</u>** वर आहे. छापील प्रथम खबरी अहवालावर माझी सही आहे. त्यावरील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर छापील प्रथम खबरी अहवाल **<u>निशाणी क्रमांक २४</u>** वर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>निशाणी क्र. २५ वरील आदेशान्वये उलटतपासणी पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| ( श्री. एम. आर. देशपांडे ) | ( श्री. एम. आर. देशपांडे ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |
| दिनांक- १०/०१/२०२३. | |